लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूम्सची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com

सोलापूर विमानतळापासून फक्त ५ कि.मी. अंतरावरील १० एकर बागायत शेतजमीन विकणे आहे. १ एकर पॉलिहाऊस, १.५ एकर शेडनेट नर्सरीसाठी उपयुक्त.
संपर्क:- 9850530355
9158821555
(594)

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ८८ वा | शनिवार, दि. २६ ऑक्टोबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# माढ्यासह पंढरपूर, परांडा आणि मोहोळचा सस्पेंन्स कायम? शरद पवार कोणाला संधी देणार?



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या उमेदवारांच्या नावाची यादी आज जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये 45 जणांना उमेदवारी देण्यात आली आहे.

पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. यामध्ये काही ठिकाणी नवीन चेहऱ्यांना संधी दिली आहे. तर काही मतदारसंघात सस्पेंन्स कायम ठेवला आहे. यामध्ये माढा, मोहोळ, परांडा तसेच पंढरपूर मतदारसंघाचा समावेश आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी 45 उमेदवारांच्या नावाची घोषणा केली आहे. मात्र, यामध्ये काही महत्वाच्या मतदारसंघात उमेदवारांच्या नावाची घोषणाच केली नाही. यामध्ये माढा, मोहोळ, परांडा तसेच पंढरपूर मतदारसंघाचा समावेश आहे. या मतदारसंघात उमेदवारी कोणाला द्यायची याचा पेच कायम आहे. कारण या चाहरी मतदारसंघात इच्छुकांची संख्या मोठी आहे. त्यामुळं उमेदवारीचा तिढा कायम आहे. त्यामुळं या सर्व मतदारसंघात चर्चा करुनच उमेदवारी घोषीत करण्यात येणार असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले. पुढच्या एक ते दोन दिवसात उमेदवाराच्या नावाची घोषणा करण्यात येणार असल्याचे पाटील म्हणाले.

### माढा विधानसभा मतदारसंघ कोण कोण इच्छुक?

माढा विधानसभा मतदारसंघातून शरद पवार यांच्या पक्षाकडून निवडणूक लढवण्यासाठी अनेकजण इच्छुक आहेत . यामध्ये विद्यमान आमदार बबनदादा शिंदे यांचे पुत्र रणजित शिंदे, तसेच अभिजीत पाटील, रणजितसिंह मोहिते पाटील, संजय बाबा कोकाटे, ॲड. मिनल साठे यांचा समावेश आहे. यामध्ये शरद पवार उमेदवारीचा माळ नेमकी कोणाच्या गळ्यात टाकणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

### पंढरपूरमधून भरीरथ भालके की प्रशांत परिचारक?

पंढरपूर-मंगळवेढा मतदारंसघातून देखील अनेकजण इच्छुक आहेत. यामध्ये विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे माजी चेअरमन भगीरथ भालके यांचं नाव आघाडीवर आहे. तर दुसरीकडून प्रशांत परिचारक यांचे नाव देखील चर्चेत आहे. त्यामुळं शरद पवार नेमकी उमेदवारी कोणाला देणार हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

### मोहोळ मतदारसंघातूनही अनेकजण इच्छुक

मोहोळ विधानसभा मतदारसंघातूनही अनेकजण इच्छुक आहे. यामध्ये माजी मंत्री लक्ष्मण ढोबळे यांचे पुत्र अभिजीत ढोबळे, संजय क्षीरसागर, तसेच रमेश कदम हे देखील इच्छुक आहेत. त्यामुळं पवार कोणाला तिकीट देणार हे पाहणं देखील महत्वाचं ठरणार आहे.

### परांड्यात शिवसेना ठाकरेंनी उमेदवार दिला पण...

परांडा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची घोषणा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे इच्छुक उमेदवार राहुल मोटे यांनी केली होती. मात्र, महाविकास आघाडीकडून या ठिकाणची जागा शिवसेना ठाकरे गटाला सुटली आहे. ठाकरे गटानं याठिकाणी माजी आमदार ज्ञानेश्वर पाटील यांचे पुत्र रणजित पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. मात्र, ही जागेवर उमेदवार बदलण्यात येण्याची शक्यता आहेय. ही जागा शरद पवार गटाला सुटण्याची शक्यता आहे. याठिकाणाहून शरद पवार गटाचे राहुल मोटे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे जयंत पाटील यांनी सांगितले आहे.

## दक्षिणची जागा काँग्रेसलाच सुटणार, मानेच लढणार, शिंदेंचा निरोप, कार्यकर्त्यांचा जल्लोष

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरात काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांचे कार्यकर्ते आक्रमक झाल्यानंतर काँग्रेस पक्षश्रेष्ठींनी मोठा निर्णय घेतला आहे. काँग्रेसच्या खासदार प्रणिती शिंदे यांच्याकडून शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना निरोप आला आहे. सोलापूर दक्षिणची जागा काँग्रेसलाच राहणार आणि

दिलीप माने यांनांच जागा सुटणार असे आश्वासन प्रणिती शिंदे यांनी दिले आहे. दिल्लीतील बैठकीनंतर काँग्रेसच्या प्रणिती शिंदे यांचा शहराध्यक्ष चेतन नरोटे यांना फोन आला आहे.



माजी आमदार दिलीप माने यांच्या बंगल्याबाहेर हजारो कार्यकर्ते एकवटले होते. खासदार प्रणिती शिंदे यांनी मला कल्पना दिली आहे की सोलापूर दक्षिणची जागा काँग्रेसला सुटणार आहे. जर ही जागा मला मिळाली नाही तर मी एकला चलो रे ची भूमिका घेणार असल्याचे माने म्हणाले. सोलापूर दक्षिण मधून काँग्रेसचे दिलीप माने यांना उमेदवारी न देता ही जागा शिवसेना ठाकरे गटाला गेल्याने कार्यकर्ते आक्रमक झाले होते.

### आता ठाकरे गट काय भूमिका घेणार?

दरम्यान काँग्रेसने घेतलेल्या या भूमिकामुळे आता ठाकरे गट काय करणार? हे पाहमं देखील महत्वाचं ठरणार आहे. कारण ठाकरे गटाकडून अमर पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांना एबी फॉर्म देखील दिला आहे. आता अमर पाटील काय नेमकी काय भूमिका घेणार? हे पाहणं महत्वाचं ठरणार आहे.

सोलापूर दक्षिणमधूनठाकरे गटानं अमर पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे. त्यानंतर काँग्रेस कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. कारण या मतदारसंघातून काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने इच्छुक आहेत. कोणत्याही परिस्थितीत माने यांनी निवडणूक लढवावी अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली आहे. दरम्यान, आज या सर्व प्रकारावर (पान 2 वर..)

## 'ठाण्याची दाढी आमच्यासोबत.' त्या 5 कोटींबाबत चर्चांना उधाण

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** खेड-शिवापूर टोल नाक्यावर सापडलेल्या 5 कोटींबाबत शिवसेना शिंदे गटाच्या नेत्याने "ठाण्याची दाढी आमच्यासोबत." असं मोठं वक्तव्य केल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ठिकठिकाणी पोलिसांकडून नाकाबंदी करत वाहनांची तपासणी सुरु आहे.

दरम्यान पुण्यात नाकाबंदी दरम्यान ५ कोटींची रोकड सापडली होती. हे ५ कोटी रुपये आमदार शहाजी बापू पाटील यांच्याशी संबंधित असल्याची माहिती समोर येत होती.



सविस्तर माहिती अशी की, खेड-शिवापूर टोल नाक्यावर जवळपास ५ कोटी रुपए जप्त करण्यात आले होते. यानंतर विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेची झोड उठवली होती. ही रक्कम शिवसेना शिंदे गटाचे शहाजीबापू पाटील यांची असल्याचा आरोप करण्यात आला होता.

शिवसेना ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी एकनाथ शिंदे यांना टार्गेट केले होते. प्रत्येक उमेदवाराला ते ७५ कोटी देणार आहेत. त्यातील १५ कोटींचा हा पहिला हफ्ता होता ,असा आरोपही राऊत यांनी केला होता. दरम्यान हे आरोप शहाजी बापू पाटील यांनी फेटाळले होते.

त्यानंतर आता शहाजी बापू यांच्या कार्यकर्त्यांने याबाबत मोठं विधान केलं आहे. नाकाबंदी दरम्यान सापडलेल्या ५ कोटी रुपयांबाबत बोलताना सांगोला शिवसेना तालुका प्रमुख दादासाहेब लवटे म्हणाले, त्या गाडीची चर्चा करू नका. त्यासाठी ठाण्याची दाढी आमच्यासोबत आहे, असं म्हणत लवटे यांनी या प्रकरणात थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा आशीर्वाद आपल्यासोबत असल्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे राजकीय वतुर्ळात चर्चांना उधाण आले आहे. अशी चर्चा जोरात सुरु आहे.



## संपादकीय

# घराणेशाही

महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यांमध्ये विधानसभा निवडणुकीची गडबड सुरू असतानाच आणि देशातील काही राज्यांमध्ये लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांची पोटनिवडणूक प्रक्रिया सुरू असताना सर्वच पातळीवर पुन्हा घराणेशाहीची चर्चा सुरू झाली आहे. सर्वात गमतीची गोष्ट ही आहे की बहुतेक सर्वच राजकीय पक्षांनी घराणेशाही या निकषाला प्राधान्य देऊनच उमेदवारांच्या नावाची जरी घोषणा केली असली, तरी प्रत्येक जण घराणेशाही या मुद्द्यावरून आपल्या विरोधकांवर टीका करताना दिसत आहे. भारतीय जनता पक्षाने पूर्वीपासून घराणेशाहीच्या मुद्द्यावरून कॉंग्रेस पक्षाला टार्गेट केले आहे. पण महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने जी आपली पहिली यादी जाहीर केली आहे त्यामध्ये सुद्धा घराणेशाहीचा प्रभाव दिसत आहे. एकनाथ शिंदे यांनी जाहीर केलेल्या शिवसेनेच्या पहिल्या यादीत आणि अजित पवार यांनी जाहीर केलेल्या राष्ट्रवादीच्या पहिल्या यादीत घराणेशाहीचेच प्रतीक उमटलेले दिसते. महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची यादीसुद्धा घराणेशाहीमुक्त उमेदवारांची असेल अशी कोणतीही शक्यता नाही. कारण घराणेशाही हा भारतीय राजकारणाचा अविभाज्य घटक झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर्षी 15 ऑगस्ट रोजी लाल किल्ल्यावरून भाषण करत असताना देशातील एक लाख सामान्य कुटुंबातील तरुणांना राजकारणात आणण्याचा संकल्प जाहीर केला होता. भारतीय राजकारण घराणेशाही मुक्त करणे आवश्यक असल्याच्या गरजेवर त्यांनी भर दिला होता.

पण त्यापूर्वी झालेली लोकसभा निवडणूक असो किंवा त्यानंतर झालेल्या विधानसभा निवडणुका असोत आणि सध्या होर्णाया महाराष्ट्र, झारखंड विधानसभा निवडणुका असोत भाजपामध्ये सुद्धा घराणेशाहीचे प्राबल्य आहे हेच समोर येत आहे. कॉंग्रेस पक्षाचे नेते राहुल गांधी यांनी काही वर्षापूर्वी कॅलिफोर्निया यूनिव्हर्सिटीमध्ये भाषण करत असताना केवळ भारतच नव्हे, तर जगातील बहुतेक देशांमध्ये सर्वच क्षेत्रांमध्ये घराणेशाही कार्यरत असल्याचा उल्लेख केला होता.

राजकारणच नव्हे तर चित्रपट उद्योग आणि शिक्षण क्षेत्रामध्ये सुद्धा घराणेशाही अपरिहार्य असल्याचा युक्तिवाद त्यांनी केला होता. भारतीय जनता पक्षाने सातत्याने कॉंग्रेसमधील घराणेशाहीवर प्रहार केल्याने त्याला उत्तर देताना राहुल गांधी यांनी अशा प्रकारे आपली बाजू मांडली होती, ती काही प्रमाणात खरीही आहे. कारण ज्याप्रमाणे डॉक्टरचा मुलगा डॉक्टर होणार किंवा वकिलाचा मुलगा वकील होणार हे सहजपणे ठरलेले असते त्याच प्रकारे भारतीय राजकारणाच्या व्यासपीठावर भारतीय राजकीय नेत्याचा मुलगा हा राजकारणातच येणार हे जणू काही गृहीतच धरलेले असते. त्यातूनच या घराणेशाहीला बळ मिळते. कोणत्याही राजकीय पक्षाचे ध्येय नेहमी निवडणुकीच्या राजकारणात यश मिळवणे हेच असते आणि या निवडणुकीच्या राजकारणामध्ये उमेदवारांना उतरवताना नेहमीच इलेक्टिव्ह मेरिट म्हणजे निवडून येण्याची क्षमता लक्षात घेतली जाते. राजकीय घराण्यातून येर्णाया उमेदवारामध्ये अनेक वेळा ही निवडून येण्याची क्षमता आपोआपच विकसित झालेली असते. त्यातूनच ही घराणेशाही अधिकच विकसित होत जाते. भारतीय लोकशाही राजकारणाला स्वातंत्र्यानंतर आता 75 वर्षे होऊन गेली असल्याने या राजकारणामध्ये घराणेशाहीच्या अनेक पिढ्या दिसल्या आहेत आणि वाढल्या आहेत. भारतीय स्वातंत्र्याच्या सुमारास जो राजकीय नेता सक्रिय होता त्याचा नातू आता विद्यमान कालावधीमध्ये राजकारणात सक्रिय झाल्याचे दिसत आहे.

काही सन्माननीय अपवाद वगळता बहुतेक सर्व राजकीय घराण्यातली नवीन पिढी आता राजकारणाचा दरवाजा ठोठावू लागली आहे आणि ही गोष्ट टाळता पण येणारी नाही. कारण पिढ्यान्पिढ्या अशा प्रकारे राजकारण सुरू असल्याने मतदारांचा एक बेस तयार झालेला असतो. उमेदवारांचा चेहरासुद्धा मतदारांना परिचित असतो. घराणेशाहीतून येर्णाया अशा उमेदवारांकडे निवडणूक लढवण्याची आर्थिक क्षमताही असते. साहजिकच बहुतेक राजकीय पक्ष एक सेफ गेम म्हणूनच घराणेशाहीतून येर्णाया उमेदवारांना प्राधान्य देताना दिसतात. सर्वच राजकीय पक्षांमध्ये अशा गोष्टी घडत असल्या तरी भाजपासारखे काही पक्ष हा विषय घेऊन अजूनही टीका करताना दिसतात.

कारण त्यांचा रोख हा पक्षाच्या प्रमुख पदावरील जी घराणेशाही आहे त्याच्यावर आहे. निवडणुकीच्या राजकारणामध्ये मात्र भाजपसुद्धा घराणेशाहीच्या दोषापासून मुक्त नाही हे उघड आहे. देशातील बहुतेक राजकीय पक्षांचे प्रमुखपद घराणेशाहीच्या पद्धतीनेच आतापर्यंत चालत आले असल्याने ती गोष्टसुद्धा आता स्वीकारावीच लागणार आहे. दक्षिणेतील राज्य असोत किंवा महाराष्ट्रासारखे राज्य असो, दीर्घकाळ राजकारणात असर्णाया घराण्यांनी आपापल्या वारसदारांनाच पक्षाशी धुरा दिलेली आहे, हे वास्तव आहे. म्हणजेच जरी निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा घराणेशाहीची चर्चा सुरू झाली असली, तरी त्याला काहीही अर्थ नाही.

कारण भाजपासह सर्वच राजकीय पक्षांनी घराणेशाही जपली आहे. पूर्वीच्या कालावधीमध्ये राजेशाही असताना ज्या प्रकारे राजाच्या मृत्यूनंतर किंवा निवृत्तीनंतर आपोआपच राज्यकारभार राजपुत्राकडे जायचा त्याच सहजतेने आता राजकारणातील ही वारसदारी पद्धती जपली जात आहे आणि जोपासलीही जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय राजकारणाचे स्वरूपही बदलत चालल्याने येर्णाया कालावधीमध्ये घराणेशाहीची पद्धत अधिकच तीव्रतेने जोपासली जाईल, असेच संकेत सध्या सुरू असलेल्या निवडणुकीच्या प्रक्रियेने दिले आहेत.

पान १ वरून

## दक्षिणची जागा कॉंग्रेसलाच...

दिलीप माने यांनी प्रतिक्रिया दिली आहे. हा माझा अपमान नसून माझे नेते सुशिलकुमार शिंदेचा अपमान असल्याचे माने म्हणाले. त्यामुळं आम्ही फॉर्म भरणार, केवळ दक्षिण सोलापुरातच नाही तर आणखी कुठंकुठं भरतो ते पाहा अशा इशारा माने यांनी दिली आहे. अपक्ष लढायचं की कसं ते आम्ही ठरवू. माझं नुकसान होऊन होऊन काय होईल, आता बघूच असा इशाराही दिलीप माने यांनी दिला आहे. वाघ म्हातारा झालाय म्हणून काय होतं. वाघ वाघ असतो असेही माने म्हणाले. ही निवडणूक आरपारची निवडणूक असेल, जनता जे ठरवेल तोच आमचा निर्णय असेल असंही माने म्हणाले.

# दारू की दूध?

या लेखाचे शीर्षक वाचून अनेकांचे डोळे विस्फारले जातील; आणि विषय समजून घेण्याची ओढ लागेल. दारू की दूध? असा प्रश्न माज्या मनात आला, यामागे बाजारपेठेतील दोन दृश्य कारणीभूत ठरली. रोजच्या हमरस्त्याशेजारी असणाऱ्या दारूच्या दुकानापुढे ज्याला वाईन शॉप म्हणतात, तेथे फार मोठी गर्दी रोज मला पाहायला मिळते. त्यामध्ये तरुणांची संख्या लक्षणीय प्रमाणात दिसते. याउलट दूध डेअरी समोर गर्दी दिसत नाही. त्याचबरोबर दूध देणारा गवळी रोज घरोघरी जाऊन दूध देतो. ऊन,वारा पाऊस याची तमा न बाळगता तो घरोघरी दूध घालताना दिसतो. त्याच्या दुधाचे बिल महिन्यानंतर दिले जातं . याउलट दारू दुकानदार कोणाच्याही घरी जात नाहीत. व्यसनाधीन लोक वाईन शॉप शोधत शोधत तेथे पोहोचतात. पहिले पैसे देतात,मगच त्यांच्या हातात बाटली मिळते. वाईन शॉप मधील सगळा व्यवहार रोकडा असतो, तर दूध देणाऱ्यासोबतचा व्यवहार उधारीवर चालतो.दूध पिल्यास ताकद मिळते.दुधात स्निग्ध पदार्थ, बी कॉम्प्लेक्स, एडीईके व्हिटॅमिन, कॅल्शियम असे घटक मिळतात. हे मानवी शरीराला उपयोगी असतात.

दूध पिल्यामुळे माणूस सुदृढ होतो. निरोगी बनतो.या उलट दारू शरीरास घातक असते. दारू पिल्यामुळे लिव्हर खराब होतो. दारूमुळे स्वतःच्या शरीराबरोबर कुटुंबाचेही नुकसान होते. घरात टंचाई निर्माण होते. दारू पिणाऱ्या बापाचे आपल्या मुलांच्या शिक्षण, आरोग्य, संस्कार या बाबीकडे दुर्लक्ष होत असते, त्यामुळे मुलांचे संगोपन व्यवस्थित होत नाही. त्यांचे भविष्य अंधारमय होते. आर्थिक संशोधन संस्था क्रइफक्रएफ आणि कायदा सल्लागार कंपनी ढछफ चेंबर्सच्या अहवालानुसार, भारतात सुमारे १६ कोटी लोक दारू पितात. या संख्येपैकी ९५ टक्के पुरुष आहेत. या पुरुषांचे वय १८ ते ४९ या दरम्यान आहे. आपल्या राज्यात दररोज सरासरी २४ लाख लिटर दारु ढोसली जाते. वर्षभरात राज्यात ८६.७ कोटी लिटर दारु विक्री होते, त्यात सर्वाधिक ३५ कोटी लिटर देशी दारुची विक्री होते. तर विदेशी दारु २० कोटी लिटर इतकी विकली जाते. बिअर ३१ कोटी लिटर इतकी विकली जाते. तर वाईन मात्र सर्वात कमी म्हणजे ७० लाख लिटर इतकी विकली जाते.महाराष्ट्रात शासकीय आकडेवारीनुसार एकूण १५ हजार टनाच्या आसपास दूध उत्पादन वर्षभरात होते. राज्यात दूध व्यवसाय हा शेतकऱ्यांसाठी एक प्रमुख जोडधंडा आहे. हा व्यवसाय अनेकांच्या उदरनिवार्हाचे साधन आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा म्हणून दूध व्यवसायाकडं बघितलं जातं. महाराष्ट्रात गहू, भात पिकानंतर दूध उत्पादन हाच ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत असल्याचे आढळून आले.पण सध्याच्या काळात राज्यातील दूध उत्पादक शेतकरी अडचणीत सापडल्याचं चित्र दिसत आहे. कारण एकीकडं दिवसें दिवस दूध उत्पादनाचा खर्च वाढत आहे तर दुसरीकडं दुधाचे दर कमी होत आहेत . इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्चच्या अहवालानुसार एका व्यक्तीला रोज किमान २८० मिलिलिटर दुधाची गरज आहे.रक्त आटवून दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला भाव का मिळत नाही? असा प्रश्न या काळात लोकांचा मनात निर्माण होत आहे. इतर कारणांप्रमाणेच कृषी तज्ज्ञांच्या मते, दुधाचं उत्पादन वाढत असताना दुसरीकडे मात्र, मागणी त्याप्रमाणात वाढत नसल्याने दुधाला योग्य भाव मिळत नाही. मागणीपेक्षा पुरवठा जास्त असल्यामुळे दुधाला भाव मिळत नाही.याउलट दारू मात्र चढ्या दराने विकली जात आहे. कारण दारूची मागणी दिवसेंदिवस वाढतच आहे.

एका बाजूला दूध तर दुसरीकडे दारू अशी तुलना करत असताना शहराबरोबर ग्रामीण भागाचे देखील चित्र बदलत्या काळानुसार बिघडल्याचे दिसून येत आहे. पूर्वी खेड्यात तरुण मुले सकाळ-संध्याकाळ तालमीत जायची. काही मुले मैदानात धावायची. व्यायाम करायची.मन लावून शिकायची. लवकर झोपायची अन्‍ लवकर उठायची. तांब्या तांब्या भरून दूध प्यायची.पण ग्लोबलायझेशन नंतर मात्र चित्र पार पालटून गेलं. प्रत्येक गोष्टीची चंगळ सुरू झाली. ज्याप्रमाणे चायनीज, अमेरिकन पिज्झा,बर्गर यासारख्या खाद्यपदार्थांनी आपल्या खाद्य संस्कृतीवर आक्रमण केलं, त्याप्रमाणे कोल्ड्रिंक, बिअर आणि वाईन यांनी आपल्या दुधावर आक्रमण केलं असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही. आज विविध उत्सवांमध्ये, घरगुती कार्यक्रमात इतकेच नव्हे तर दुःखद आणि आनंदी प्रसंगी सुद्धा दारू पिऊन लोक झिंगत असताना दिसतात. पूर्वी 'संसार उध्वस्त करते दारू,बाटलीस स्पर्श नका करू!' यासारख्या जाहिराती टीव्ही, रेडिओवर ऐकायला मिळायच्या. त्याचा समाजावर सकारात्मक परिणाम व्हायचा. आता मात्र अशा लोकहितार्थ जाहिराती बंद झाल्या आहेत.याउलट वाईनच्या जाहिराती दाखवायची बंदी असतानाही, त्याऐवजी त्याच नावाच्या सोडा वॉटर च्या जाहिराती दाखवल्या जातात.शासनाच्या महसुलात वाढ करणारी दारू तरुणांचे भविष्य अंधकारमय करत आहे! याचा विचार कुठेतरी होत आहे का?शहरातील झोपडपट्टयात,लहान लहान गावात गावठी दारू पिऊन तरुण मुले कमी वयात आपला जीव गमावत आहेत. त्यांच्या बायका कमी वयात विधवा होत आहेत. अशाप्रकारे मोठ्या प्रमाणावर दारूच्या व्यसनामुळे एकल विधवा आणि परित्यक्ता महिलांची संख्या वाढताना दिसत आहे.

लहान लहान मुलांच्या डोक्यावरील पितृछत्र हरवल्यामुळे ही मुले सर्वच बाबतीत मागे पडत आहेत. अर्धवट शिक्षणामुळे, कौशल्य विकास शिक्षणाच्या आभावामुळे आयुष्यभर बेकारीत त्यांना जीवन जगावे लागत आहे. यातील काही मुले गुन्हेगारीकडे वळताना पाहायला मिळत आहेत. तर काही आपल्या बापाप्रमाणेच दारूच्या व्यसनाच्या आहारी जात आहेत. दारुड्या बापाचा मुलगा दारुडा आणि पुन्हा त्याचा मुलगाही दारुडा असे चक्र समाज संतुलन बिघडवत आहे.दारूमुळे कौटुंबिक हिंसाचाराचा महिलांना, लहान मुलांना सामना करावा लागत आहे. यामुळे,'मुलगी आडात ढकलून द्यावी पण दारुड्याला देऊ नये' ही म्हण आज समाजात रूढ झाली आहे.

अशाप्रकारे समाजाला दारूचा विळखा पडल्याचं चित्र दिसत आहे. जागतिक आरोग्य संघटना दारु पिणाऱ्या व्यक्तीला मानसिक आजारी समजते. अशा या मानसिक आजाराची साथच आली आहे का? असा प्रश्न अशी वाईन शॉप च्या समोर भरलेली जत्रा पाहून एखाद्याच्या मनात निर्माण झाल्याशिवाय राहत नाही.

दारू पिणे ही फॅशन किंवा प्रतिष्ठा न समजता 'विकृती' आहे, तर दूध पिणे हा शहाणपणा आहे! अशी समज समाजात निर्माण होणे, आजच्या घडीला आवश्यक बनले आहे.



- किशोर जाधव, सोलापूर
मो. नं. ९९२२८८२५४१

## प्रबोधन

# संत साहित्य । हे विसंगत

संतसज्जन हा शब्द जसं संतांचं पूर्ण वर्णन करू शकतो, तसंच तो सज्जनांचंही पूर्ण वर्णन करू शकतो. कारण संत हे निरापवादपणे सज्जन असावेच लागतात आणि सज्जन माणसं संतांसारखीच शुद्धाचरणी असतात. पण तरीही संत थोर की सज्जन थोर हा विचार करावाच लागतो. तुलनाच केली तर संत हे अभंगरचना करणं, ईश्वरनामाचं संकीर्तन करून समाजात नाव मिळवणं, आपला विशिष्ट संप्रदाय स्थापन करणं, मुख्यतः संसारपाशातून सुटण्यासाठी आपल्या घरादाराकडे, मुला-लेकरांकडे दुर्लक्ष करणं, आणि मठ-मंदिरं पर्वतगुंफा. अशा एकांतात कालक्रमण करणं, असं वर्तन करून सतत समाजाविन्मुखता जोपासत असतात. सज्जन माणसं मात्र गृहस्थाश्रम सांभाळतात. ती संतांच्या कीर्तनाला हजेरी लावतील, पण घरच्या मुलांच्या अभ्यासाकडेही लक्ष देतील. दिंडीत चारच पावलं टाकून आपल्या उद्योगधंद्याकडे वळतील. देवांच्या पालख्या वाहतील; पण कुणी मायबहीण आपल्या पायांवर पाणी ओतून नमस्कार करील म्हणून चटकन पालखी दुस ्याच्या खांद्यावर देऊन बाजूला होतील. कारण ते गृहस्थ अधिक आणि विरक्त कमीत कमी असतात. म्हणूनच समाजाच्या अस्तित्वाची जबाबदारी समर्थपणे, कर्तव्यबुद्धीने जोपासणारी सज्जन माणसं संतांहून फार थोर असतात. समाजभूमीत सज्जन माणसांच्या रूपाने मुळांचा विस्तार नसता, तर संतरूपी वृक्ष उभेच राहिले नसते. मग बुंधा थोर की मुळं थोर? हे वेगळं सांगण्याची गरज नाही.

जगद्गुरू तुकोबाराय संतही होते आणि सज्जनही होते, म्हणूनच राष्ट्रसंत तुकडोजींनी तुकोबांचा उपदेश समाजासमोर ठेवताना ग्रामगीतेत लिहिलं, करावा सुखाने संसार। करावा अतिथींचा सत्कार। बांधा सोपे, माड्या, घर। उत्तम व्यवहारे धन जोडा॥ म्हणोनि संती गृहस्थ गौरविला। धन्य धन्य म्हणितले त्याला। तोचि जगाचा माता-पिता ठरला। पालनपोषणकरणारा॥ तुकाराम महाराजांनी लोकांना दिलेल्या कजार्ची कागदपत्रं इंद्रायणी नदीत बुडवून लोकांना कर्जमुक्त केलं, पण आपला गृहस्थधर्म सोडला नाही. छत्रपती शिवरायांनी पाठवलेलं धन स्वीकारलं नाही. पण विरक्त म्हणून घराचा, बायकोमुलांचा त्यागही केला नाही. सज्जन व्यक्ती शस्त्रांच्या सामर्थ्यावर विसंबून जीवन जगत नाही. तुकोबांनीही कधी हाती शस्त्र घेतलं नाही, पण नाठाळाचे माथी काठी हाणू या विचारांचा त्यागही केला नाही. शस्त्रापेक्षा भयंकर आघात करणारं शब्दशस्त्र मात्र त्यांनी प्रयत्नाने सतत लखलखीत ठेवलं आणि म्हणाले, आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन शब्दे वाटू धन, जनलोका। याचा अर्थ ते गृहस्थाश्रमी होते, विचारवंत होते, साहित्यजीवी होते, समाजनिष्ठ होते, प्रतिकारनिष्ठही होते, गृहस्थधर्मी होते आणि शेवटी संत होते. पण त्यांना संतपणाची बाधा शेवटपर्यंत झाली नाही.

पण आज संत या शब्दाने ज्यांचा उल्लेख केला जातो, त्यांनी समाज सुधारला की बिघडवला, याची मात्र चिकित्सा कठोरपणे केली पाहिजे. खरं तर, संतांच्या गुणदोषांची चर्चा करण्याआधी संतचरित्रं लिहून ज्यांनी संतांना लौकिक पातळीवरून अलौकिक पातळीवर नेलं, ते चरित्रलेखक सामाजिक दृष्टीने खरे गुन्हेगार असून अशा चरित्रलेखकांवर कायद्याने बंदी आणणं गरजेचं आहे. साईबाबांनी पणतीत पाणी घालून दिवे पेटवण्याचा चमत्कार कधीही केला नसेल. पण चरित्रकारांनी आणि चित्रपटकारांनी आपल्या माध्यमाने चमत्काराचा साक्षात्कार घडवलाच! तुकारामही असेच सदेह वैकुंठास गेले. ज्ञानेश्वरांनी भिंत चालवली. रेड्यामुखी वेद वदवले. आज स्वामी समर्थांची, साईबाबांची, गजानन महाराजांची, सत्यसाईची पोथ्या-पुराणं उपलब्ध असून त्यांचे भावुक भक्त त्यातील चमत्कार वाचनाने आणि दूरचित्रवाणीवरील मालिकांनी धन्य होत आहेत.

संतांना चमत्कारी बनवण्यात हिंदू तसेच ख्रिश्चन, मुसलमान सारेच धर्मीय सारखेच आहेत. ख्रिस्ती लोकांनी मदर टेरेसा यांच्या वास्तव जीवनात अलौकिक कथा रचून, घुसडून मग संत ही पदवी त्यांना दिली. तीसुद्धा एकविसाव्या विज्ञानयुगात! त्यामुळे युरोपियन समाजाचीही अब्रू गेली.

समाजातील सामान्य बुद्धीच्या जनतेला चमत्कार, जादूटोणा, भूतपिशाच, दिव्यशक्ती, अलौकिक लीला, वाचासिद्धी (एक गौडबंगाल) साक्षात्कार, स्वप्नदृष्टान्त, हातगुण, स्पर्शगुण, कृपादृष्टी, दिव्यदृष्टी, रेकीपद्धती, टेलिपथी, अशा अनेक कपोलकल्पित, वांझोट्या गप्पांमध्ये खूप रस असतो. यांच्या प्रसारप्रचाराचं कार्य विनामोबदला ही गचाळ मेंदूची निर्बुद्ध माणसं रात्रंदिवस करीत समाजाच्या बौद्धिक जीवनाची पातळी रोगट थरापर्यंत घसरवीत असतात. अशा वातावरणात वावरताना शहाण्या माणसांनी कर्तव्य बुद्धीने, कोणाच्या भावना दुखतील अशी भीती न बाळगता न्यायाधीशासारखे अंधश्रद्धाळू कृती, विचार, समज आणि तत्त्वज्ञान (?) यावर शेरेबाजी केली पाहिजे. राष्ट्रसंत तुकडोजी शुद्ध बुद्धिवादातून उपदेश करतात, याचे उत्तर ऐका श्रोते। संत जरी चमत्कारे तारिते ।तरी कोणीच न उरते। आजवरी बद्ध जनी ॥ करोनिया चमत्कार। संत न करिती उद्धार। हाच मनी राखा निर्धार। बोधचि सार तयांचा॥ तात्पर्य सुजनचरित्रे परमपवित्रे सादर वणार्वी हेच खरे, संत चरित्रांचे पारायण नको! कारण-

संत सुधारक । कधी वाटतात
कधी वाटतात । मागासले ॥१
देव आहे असे । कधी म्हणतात
कधी म्हणतात । देव खोटा ॥२
नाठाळा काठीने । हाणाया उठती
तेच दुष्टा हाती । पडतात ॥ ३
विश्वाला आपुले। घर मानताती
लावून बसती । ताटी तेच ॥४
अभक्तासारखे` कधी बोलताती
कधी शिव्या देती। अभक्तास ॥५
देवापाशी नाही । मुक्तीचे गाठोडे
म्हणूनिया पुढे । जाती क्षेत्र ॥६
तीर्थी धोंडा-पाणी । कधी म्हणतात
तीर्था वर्णितात । छान शब्दी ॥७
संत साहित्य । हे विसंगत
करावी संगत। मर्यादित ॥८



प्रा. डॉ. जे. बी. शिंदे
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# करमाळा विधानसभा मतदारसंघातील छत्तीस गावातून ६० मतांचा लीड मिळाला मिळवण्यासाठी प्रयत्न करा : आ. शिंदे

**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):-** करमाळा विधानसभा मतदारसंघात माढा तालुक्यातील कुडूर्वाडी सह ३६ गावांचे जोडली आहे. याठिकाणी १ लाखच्या पुढे मतदार आहेत. सगळ्यांनी मिळून ८० टक्केच्या पुढे मतदान होईल यासाठी प्रयत्न करा. एक लाखातील ८० हजार मतदान झाले तर यामधील नारायण पाटील यांना किती मतदान मिळेल हे कोणीही सांगावे. त्यांच्याच बैठकीत ३६ गावातुन ८ हजार ही मते ही मिळणार नाहीत अशी त्यांची चर्चा सुरू आहे. ८० हजार मतदान पोलिंग झाले तर नारायण पाटील यांना १० नाही २० हजार मते पडू द्या. आपल्याला ६० हजार मताचा लीड मिळेल यासाठी कार्यकर्त्यांनी ग्रामपंचायत प्रमाणे मतदान करून घेण्याचे आव्हान आ. संजय शिंदे यांनी व्यक्त केला.




कुर्डूवाडी येथील संकेत मंगल कार्यालयामध्ये ३६ गावातील कार्यकर्त्यांचा संवाद मेळावा आयोजित करण्यात आला होता त्यावेळी आ. संजय शिंदे बोलत होते.


प्रारंभी विठ्ठल साखर कारखान्याचे संचालक वामन उबाळे, आप्पासाहेब उबाळे, कुडूर्वाडी माजी उपनगराध्यक्ष बापूसाहेब जगताप, नगराध्यक्ष समीर मुलाणी, नगरसेवक संजय गोरे, कुडुर्चे संदीप पाटील,आमोल लोंढे, संतोष अनभुले, लक्ष्मण शेळके, रवींद्र ननवरे, हर्षल बागल, जगन्नाथ क्षीरसागर आदींनी मनोगत व्यक्त केले.

आ. संजय शिंदे पुढे म्हणाले नारायण पाटील यांना २०१४ ते १९ दरम्यान स्थिर सरकार होते. यावेळी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याबरोबर पाटील यांचे चांगले संबंध होते. या दरम्यान तुम्ही काय विकास केला हे त्यांनी सांगावे. कुणावर काही टीका करत बसू नका आपण कुणाला नाव ठेवून नाही. तर आपल्या कर्तुत्वावर आमदार झालो आहे. असे म्हणत त्यांनी आपल्या विकास कामाचा आराखडा मांडला.

करमाळ्यातील कोणत्याही कोपऱ्यातील गावात २० वर्ष कधीही आमदार गेला नव्हता त्या ठिकाणी मी विकास कामे केले आहेत.अस्थिर सरकार असतानाही अजितदादा पवार यांच्यामुळे मी करमाळा तालुक्याचा विकास करू शकलो. यासाठी ग्रामपंचायतीच्या निवडणुकी प्रमाणे मतदान करून तर कुर्डुवाडी शहरातील १५ हजार पर्यंत मतदार जाईल यासाठी या ठिकाणच्या कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला पाहिजे. आमदार झाल्यानंतर दोन वर्ष स्थिर सरकार मिळाल्यानंतर कामाचा एक विषय ठेवणार नाही. यामुळे करमाळा विधानसभा मतदारसंघातून कुणालाही उभारायची तलप होणार नाही.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर शिरसागर यांनी केले तर आभार उद्योजक सिद्धेश्वर पाटील यांनी मानले.

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन स्पर्धेत श्री.शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूल प्रथम



**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-**भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत राज्य शासनाने राबवलेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' (टप्पा क्रमांक -2) या अभियानामध्ये श्री.शारदेय गुरुकुल पब्लिक स्कूल, टेंभुर्णी.(सी.बी.एस.ई बोर्ड -Affiliation No-1131058) या शाळेने खासगी शाळा गटात तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावून तीन लाखांचे पारितोषिक मिळवले आहे.

शाळेचे प्राचार्य. एस. व्ही. इंगोले, यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व विद्यार्थ्यांनी आणि शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी एकत्र येऊन या स्पधेर्साठी नियोजनपूर्वक प्रयत्न केले. या प्रयत्नांना या पुरस्काराच्या रूपाने यश आले. महाराष्ट्रातील नंबर एकचा पायाभूत सुविधांचा पुरस्कार,आत्याधूनिक सोयी सुविधा युक्त इमारत, डिजीटल वर्ग खोल्या, प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष, निसर्ग रम्य वातावरण व प्रदूषण विरहित अशी 25 एकरात भव्य दिव्य अशी सुंदर शाळा अशी या शाळेची वैशिष्ट्ये आहेत. अगदी सामान्य घरांमधून आलेल्या विद्यार्थ्यांना अत्यंत प्रामाणिकपणे आणि मनापासून शिक्षण देऊन, त्यांचा सर्वांगीण विकास करून, समाजामध्ये, विविध क्षेत्रांमध्ये नावलौकिक मिळवून समाजाची सेवा करण्यासाठी चांगले नागरिक घडविर्णाया या शाळेच्या आजपर्यंतच्या प्रयत्नांना महाराष्ट्र शासनाकडून मिळालेली ही शाबासकीची थाप आहे.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन बाळासाहेब देशमुख, सचिव हर्षवर्धन देशमुख, संचालक सूरज देशमुख, तसेच संथेच्या कार्यकारी संचालिका प्रियंका देशमुख यांनी व गट शिक्षण अधिकारी विकास यादव साहेब पंचायत समिती कुडूर्वाडी ता. माढा, शिक्षण विस्तार अधिकारी शोभा लोंढे मॅडम, उजनीनगर टेंभुर्णी केंद्राचे केंद्र प्रमुख संतोष वरकुटे सर यांनी विशेष अभिनंदन केले.

## वात्रटिका

### आधीच थाट

रातभर दळण दळले
पण पीठ गळले नाही...
भावा भावाचे ठरताना
कोण मोठा कळले नाही...
वाटाघाटीत पुन्हा पुन्हा
इथे तिथे घाट आहे...
तिकीट मिळाले फक्त पण
निवडून आल्याचा थाट आहे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

# सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचा ६३ वा बॉयलर अग्नी प्रदिपन समारंभ संपन्न.

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** शंकरनगर-अकलूज येथील सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याचा सन २०२४-२५ चा ६३ वा अग्नी बॉयलर प्रदिपन समारंभ कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे शुभहस्ते संपन्न झाला. या बॉयलर प्रदिपन समारंभानिमित्त दिवशी सकाळी श्री सत्यनारायण महापूजा कारखान्याचे संचालक रामचंद्र बाबा ठवरे व त्यांच्या सुविद्य पत्नी कुसुम रामचंद्र ठवरे या उभयतांचे शुभहस्ते संपन्न झाली. कारखान्याने चालू गळीत हंगाम सन २०२४-२५ मध्ये ९ लाख मे.टन ऊस गाळप करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे. त्यासाठी सर्व मशिनरीच्या ट्रायल्स पुर्ण झालेल्या असून प्रतिदिवशी ८५०० मे.टनापेक्षा जास्त ऊस गाळप करण्यासाठी यंत्रप्रणाली कार्यान्वीत केली आहे.त्यानुसार ऊस तोडणी व वाहतूक यंत्रणा भरलेली असून कारखान्याचे सर्व सभासद व बिगर सभासद यांनी नोंदीचा व बिगर नोंदीचा सर्व ऊस कारखान्यास देऊन सहकार्य करावे असे आवाहन




करून मागील गळीत हंगाम २०२३-२४ मध्ये गळीतास आलेल्या ऊसाकरीता ठरलेल्या धोरणाप्रमाणे अनुदानाची रक्कम ऊस पुरवठादार शेतकरी यांचे खातेवर जमा केली असून व परंपरेप्रमाणे कारखाना कर्मचारी यांना बोनस देण्यात आला असल्याचे कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले यांनी सदर प्रसंगी सांगितले.

या प्रसंगी कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक लक्ष्मण शिंदे, नानासाहेब मुंडफणे, विजयकुमार पवार,रामचंद्र सिद, विराज निंबाळकर, रावसाहेब पराडे, भिमराव काळे, गोविंद पवार, तज्ञ संचालक प्रकाशराव पाटील, रामचंद्र सावंत-पाटील, संचालिका सुजाता शिंदे, कार्यलक्षी संचालक रणजित रणनवरे, शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, विनायक केचे, राजेंद्र भोसले, अमृतराज माने-देशमुख, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, अनिलराव कोकाटे, श्रीकांत बोडके,सौ. हर्षाली निंबाळकर, माजी संचालक भिमराव काळे, केशव ताटे, सुभाष पताळे, शिवाजीराव सिद, राजेंद्र मोहिते, महादेवराव घाडगे, विजय माने-देशमुख, रामचंद्र चव्हाण, नितीन निंबाळकर तसेच सभासद, खातेप्रमुख, कामगार, कामगार व युनियन प्रतिनिधी उपस्थित होते.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# अट्टल मोटारसायकल चोर जेरबंद टेंभुर्णी पोलीस डिबी पथकाची कारवाई

## चोरटयांकडून ७,४०,००० रू. किंमतीच्या चोरीच्या १५ मोटारसायकली जप्त

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** टेंभुर्णी पोलीस ठाणे हददीत मोटारसायकल चोरीचे गुन्हे वाढत चालल्याने पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, यांनी विशेष पथकाची नेमणुक करून मोटारसायकल चोरांना पकडण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे टेंभुर्णी पोलीस ठाणेचे पोलीस निरिक्षक दिपक पाटील यांनी टेंभुर्णी पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख पोसई कुलदिप सोनटक्के, सपोफौ विलास रणदिवे, पोहेका विलास नलवडे, पोहेकॉ संदिप गिरमकर, पोहेका विनोद साठे, पोना प्रविण साठे यांना मोटारसायकल चोरांची माहिती काढून त्यांना पकडण्याबाबत मार्गदर्शन करून आदेश दिले होते. डिबी पथकाचे पोसई कुलदिप सोनटक्के व त्यांचे पथकातील पोलीस अंमलदार यांनी अहोरात्र मोटारसायकल चोरांची गोपनीय माहिती काढून तसेच सोलापूर सायबर शाखेचे पोकॉ व्यंकटेश मोरे यांचेकडून वेळोवेळी मोबाईल सीडीआर प्राप्त करून घेवून त्यांचे बुध्दीकौशल्याने तांत्रिक विश्लेषण करून तपास केला. त्यानंतर दिनांक २१/१०/२०२४ रोजी डि बी पथकाचे अधिकारी अंमलदार हे मोटारसायकल चोरटयाचा टेंभुर्णी गांवचे परिसरात शोध घेत असतांना अकलूज रोड, खुळे वस्ती येथे दोन इमस बिगर नंबरची स्प्लॅन्डर मोटारसायकल घेवून संशयीतरित्या फिरत असतांना दिसून आल्याने त्यांना पोलीसांनी पाठलाग करून शिताफीने पकडले.त्यांनी सांगितलेली नांवे उमेश बंडू कवडे वय २१ वर्षे रा. मिसाळवस्ती, पिंपळवाडी, वाघोली ता. माळशिरस जि. सोलापुर व प्रथमेश विठठ्ल वेदपाठक वय-२२ वर्षे मुळ गांव रा. मराठी शाळेच्या पाठीमागे इसबावी, पंढरपूर ता. पंढरपूर सध्या रा.



आनंद कॉम्प्लेक्स, रूम नं.२०२ ढोरेवस्ती केसनंद वाघोली ता. हवेली जि. पुणे अशी असल्याची सांगितली. त्यांचे ताब्यात असलेली बिगर नंबरची हिरो स्प्लेंन्डर मोटारसायकल बाबत तपास केला असता त्यांनी प्रथम उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर त्यांना विश्वासात घेवून तपास केला असता त्यांनी सदरची मोटारसायकल ही लोणीकंद पोलीस ठाणे पुणे येथून चोरी केली असल्याची कबुली दिलेने त्यांना अधिक तपास करणेकामी अटक करून त्यांची न्यायालयाकडून पोलीस कस्टडी रिमांड घेवून त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांनी मागील एक वर्षामध्ये टेंभुर्णी लोणीकंद, चंदननगर, बारामती, पुणे इत्यादी ठिकाणचे परिसरातून चोरलेल्या ७,४०,०००/- रुपए किंमतीच्या एकुण १५ मोटारसायकली तपासामध्ये त्यांचेकडून जप्त करण्यात आलेल्या असून चोरीच्या मोटारसायकल बाबत लोणीकंद, चंदननगर, बारामती, पुणे इत्यादी पोलीस ठाणेमध्ये चोरीचे गुन्हे दाखल आहेत. कवडे व वेदपाठक आरोपींकडून खालील नमुद पोलीस ठाणेंच्या गुन्हयातील चोरीस गेलेल्या मोटारसायकली हस्तगत करण्यात आलेल्या आहेत. उमेश कवडे व प्रथमेश वेदपाठक या दोन आरोपींनी चोरी केलेल्या ७,४०,०००/- रुपए किंमतीच्या एकुण १५ मोटारसायकली त्यांचेकडून तपासामध्ये जप्त करण्यात आलेल्या आहेत. त्यांचेकडून आणखीन मोटारसायकल चोरीचे गुन्हयांची उकल होण्याची शक्यता असून त्या अनुशंगाने टेंभुर्णी पोलीस तपास करीत आहेत. सध्या आरोपी दिनांक २४/१०/२०२४ रोजीपर्यत पोलीस कस्टडी रिमांड मध्ये अटकेत आहेत.

सदरची कामगिरी सोलापूर ग्रामीणचे पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, अप्पर पोलीस अधिक्षक प्रितम यावलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी करमाळा उपविभाग अजीत पाटील, टेंभुर्णी पोलीस ठाणेचे पोलीस निरिक्षक दिपक पाटील यांचे मार्गदर्शना प्रमाणे टेंभुर्णी पोलीस ठाणेचे डिबी पथकाचे प्रमुख पोसई कुलदिप सोनटक्के व त्यांचे पथकातील सपोफौ. विलास रणदिवे, पोहेकॉ विलास नलवडे, पोहेका संदिप गिरमकर, पोहेकॉ विनोद साठे, पोना प्रवीण साठे तसेच सायबर शाखेचे पोकॉ व्यंकटेश मोरे यांनी पार पाडलेली आहे. वर नमुद तक्त्यातील अ.नं. ९ ते १५ चे मोटारसायकल मालकांनी टेंभुर्णी पोलीस ठाणेस संपर्क साधावा असे अवाहन पोलीस निरीक्षक दीपक पाटील यांनी केले आहे.

# शिवरत्नच्या बीबीए महाविद्यालयाला नॅक कडून बी++ श्रेणी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** येथील शिवरत्न शिक्षण संस्था संचलित शिवरत्न इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज या बीबीए अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाला बेंगळुरू राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषदाची (नॅक) कडून नुकतेच ब+ श्रेणी प्रदान करण्यात आले. २९ व ३० ऑगस्ट रोजी राष्ट्रीय मूल्यांकन व प्रमाणन परिषदाची (नॅक पीअर टीम) तज्ञ समीतीने भेट देऊन महाविद्यालयातील विविध पैलूंची तपासणी करून बेंगळुरू येथील नॅक कार्यालयाला अहवाल सादर केला होता. त्या अहवालानुसार महाविद्यालयाला ब++ ही श्रेणी प्राप्त झाली आहे. बेंगळूरच्या राष्ट्रीय मूल्यांकन आणि प्रमाणन परिषद या संस्थेने नियुक्ती केलेल्या तज्ञ समितीत दिल्ली येथील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, दिल्ली विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजयकुमार सिंग, चंडीगड येथील चंडीगड विद्यापिठाचे संचालक डॉ. निलेश अरोरा व तिरपुत्तूर (तमिळनाडू) येथील स्कॅर्ड हार्ट या अटॅनॉमस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मारिया ॲटोनी राज यांची काम पाहिले. सदर समितीने महाविद्यालय परिसरातील ग्रंथालय, वसतीगृह, जिमखाना, प्रशासकीय कार्यालय, प्रसाधनगृह, खेळाचे मैदान, संगणक कक्ष या भौतिक सुविधांसह शैक्षणिक व शिक्षकेतर उपक्रम आदी बाबींची पडताळणी व तपासणी केली होती. तसेच सदर समिती संस्थेचे प्रमुख खासदार धैर्यशील मोहिते पाटील, अध्यक्षा शितलदेवी मोहिते पाटील, सचिव धर्मराज दगडे, प्राचार्य डॉ. अरविंद कुंभार, यांच्या सह महाविद्यालयाचे विकास समितीच्या सदस्यांबरोबर बैठक आयोजित करून महाविद्यालयाच्या गेल्या पाच वर्षातील वाटचालीचा आढावा घेण्यात आला होता. सदर समितीने महाविद्यालाच्या माजी विद्यार्थी, पालक व सध्या प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला होता. सदर मूल्यांकनासाठी महाविद्यालयाच्या महाविद्यालय विकास समितीचे पालक संचालक डॉ. विश्वनाथ आवड, अरूण एकतपुरे, शहजादी काझी, संस्थेचे प्रशासनाधिकारी अश्रफ शेख, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षचे समन्वयक प्रा. भरत साठे शिवरत्न शिक्षण संस्थेचे सर्व संचालक सर्व शाखांचे प्रमुख व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. ग्रामीण भागातील बीबीए महाविद्यालयाने मिळविलेल्या या यशाबद्दल संस्थेचे मार्गदर्शक खासदार धैर्यशील मोहिते -पाटील, संस्थेचे अध्यक्षा शितलदेवी मोहिते -पाटील, पालक यांनी अभिनंदन केले आहे.


# प्रणाली बांगर यांचा शाळेच्या वतीने सत्कार



**वैराग (कटूसत्य वृत्त):-** शिक्षणमहर्षी बाळासाहेब कोरके यांच्या वैराग येथील इंदिरानगर आश्रमशाळेतील विद्यार्थिनी प्रणाली कल्याण बांगर यांनी पोलिस भरती परीक्षेत यश संपादन केले आहे. त्याबद्दल आश्रमशाळेच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आला. अध्यक्षस्थानी प्राचार्य खंडेराया घोडके, तर प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक विकास पाटील, विजय डोईफोडे होते. यावेळी प्रणाली बांगर म्हणाल्या की, मी या भरती परीक्षेत यश संपादन करताना अनेक समस्यांना सामोरे गेले. पायाला दुखापत झाली, पण मी हार मानली नाही. या आश्रमशाळेतील शिक्षकांनी जे ज्ञान दिले आहे त्या ज्ञानाच्या बाळावर मी या पदापर्यंत पोहोचले. प्राचार्य, मुख्याध्यापक व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रणाली बांगर यांचे कौतुक केले. सूत्रसंचालन प्रा.बाळासाहेब वाळके यांनी केले, तर आभार विजय डोईफोडे यांनी मानले.

# काय झाडी, काय डोंगर फेम आमदार शहाजी पाटील यांचे खंदे समर्थक चंद्रशेखर काटे यांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश..!

**सांगोला (कटूसत्य वृत्त):-** सांगोला तालुक्याचे शिंदे गटाचे आमदार शहाजी पाटील यांचे निकटवर्तीय म्हणून संपूर्ण सांगोला तालुक्याला परिचित असणारे चंद्रशेखर काटे यांनी शहाजी पाटील यांना आज सोडचीटी दिली. चंद्रशेखर काटे यांनी शहाजी पाटील यांच्यासाठी अनेक वर्ष कार्यकर्त्यांची फौज तयार केली होती, परंतु शहाजी पाटलांची गद्दारी त्यांच्या जिव्हारी लागल्यामुळे त्यांनी आ. शरद पवार साहेब यांचा नेतृत्वावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये जिल्हाध्यक्ष आ. बळीराम काका साठे यांच्या हस्ते



पक्ष प्रवेश वडाळा येथे करण्यात आला. यावेळी त्यांनी त्यांचे असंख्य कार्यकर्ते घेऊन शक्तिप्रदर्शन केले, या पक्षप्रवेशासाठी जिल्हा संघटक संजय जाधव व राष्ट्रीय छावा संघटनेचे उत्तर तालुका अध्यक्ष रतिकांत पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. यावेळी चंद्रशेखर काटे यांचे विशेष सहकारी विजय चव्हाण, विजय बाजारे, अजित तांबोळी, संतोष देशमुख, धनजय विभुते, संतोष गुरव, सहील सरतापे यांच्यासह असंख्य कार्यकर्त्यांनी जाहीर पक्षप्रवेश केला. यावेळी मनोज साठे, जितेंद्र शिलवांत, नागेश पवार, गणेश पाटील, महेश बोराडे यांची प्रमुख उपस्थिती होती..!

# लोकमंगल कृषी जैवतंत्रज्ञानच्या विद्यार्थ्यांचा हैदराबाद अभ्यास दौरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** श्रीराम ग्रामीण संशोधन व विकास प्रतिष्ठान संचलित लोकमंगल कृषीजैवतंत्रज्ञान महाविद्यालयातील चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांचा हैदराबाद येथे अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांनी इंडियन इन्स्टिटयूट ऑफ मिलेट रिसर्च, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ राईस रिसर्च, इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ऑइलसीड रीसर्च, सेंट्रल रिसर्च इन्स्टिटयूट ऑफ ड्रायलँड अग्रीकल्चर नॅशनल ब्युरो ऑफ प्लॅंट जेनेटिक रिसर्च, इंडियन क्रॉप्स रिसर्च इन्स्टिटयूट फॉर सेमी अरिड ट्रॉपिक्स आदी राष्ट्रीय संशोधन संस्थांना भेट दिली. इंडियन इन्स्टिटयूट ऑइलसीड रिसर्च येथे डॉ. मंगेश दुधे (शास्त्रज्ञ) यांनी विद्यार्थ्यांना विविध तेलबियांविषयी (सुर्यफुल, जवस, एरंड, करडई) व त्यांमध्ये वापरलेल्या तंत्रज्ञानाविषयी माहिती सांगितली. इंडियन इंस्टिट्यूट ऑफ ऑइलसीड रिसर्च येथे विद्यार्थ्यांनी कृषीजैवतंत्रज्ञान विभाग, वनस्पती ऊती संवर्धन विभाग, सूक्ष्मजीवशास्त्र विभाग आदी विभागांना भेट देऊन तेथील प्रगत तंत्रज्ञानाची माहिती घेतली. यासोबतच 'न्युट्रीहब' नावाच्या व्यवसाय विकास सेवा प्रकल्पाची माहिती जाणून घेतली. इंडियन इंन्स्टिटयूट ऑफ राईस रिसर्च व सेंट्रल रिसर्च इंन्स्टिटयूट ऑफ ड्रायलँड अग्रीकल्चर येथील शास्त्रज्ञांसोबत संवाद साधून बायोफोर्टिफिकेशन, मॉलिक्युलर मार्कर टेकनॉलॉजि, ट्रान्सजेनेसिस यांसारख्या विविध पद्धतींचा वापर करून पिकांच्या जाती कशा निर्माण केल्या जातात याची माहिती विद्यार्थ्यांनी जाणून घेतली. या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांनी बिर्ला मंदिर, एन. टी. आर गार्डन, हुसेनसागर, गोवळकोंडा किल्ला, चारमिनार आदी पर्यटनस्थळांना भेट दिली. या सहलीसाठी प्रा. सागर महाजन व प्रा. सायली बडेकर यांचा सहभाग होता. या सहलीसाठी प्राचार्य प्रदीप आदलिंगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# माजी आ.नारायण पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल



**करमाळा (कटूसत्य वृत्त):-** करमाळा विधानसभा मतदारसंघातून राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पवार पक्षातून माजी आ.नारायण पाटील यांनी गुरुवारी उमेदवारी अर्ज दाखल केला. विधानसभा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षातून त्यांना अगोदरच उमेदवारी जाहीर झालेली होती. गुरूवारी करमाळा विधानसभेसाठी त्यांनी अर्ज निवडणूक निर्णय अधिकारी अंजली मरोड यांच्याकडे दाखल केला. यावेळी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी शिल्पा ठोकडे देखील उपस्थित होत्या. यावेळी जिल्हा परिषदेच्या मजी सदस्या सविता देवीराजे भोसले, बारामती ॲग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे, नवनाथ झोळ, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष संतोष वारे, देवानंद बागल, प्रवक्ते सुनील तळेकर उपस्थित होते.

# समाजासाठी तळमळीने कार्यरत सामाजिक संस्था म्हणजे देशाचे भविष्य

## डी. राम रेड्डी : केतन वोरा मित्र परिवारातर्फे ३ हजार २२० गरजूंना दिवाळी फराळ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजासाठी तळमळीने कार्यरत असणाऱ्या सामाजिक संस्था म्हणजे देशाचे भविष्य आहेत, असे प्रतिपादन बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी यांनी केले. ३२ संस्थांमधील ३ हजार २२० गरजूंना केतन वोरा मित्र परिवारातर्फे दिवाळी फराळ वाटपाचा कार्यक्रम उद्योगवर्धिनी संस्थेत शनिवारी झाला. उपक्रमाचे हे चौथे वर्ष आहे.

यात्प्रसंगी व्यासपीठावर बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक डी. राम रेड्डी, व्यापारी बँकेचे अध्यक्ष गिरिधारी भुतडा, केतन वोरा, नंदकुमार आसावा, उद्योगवर्धिनी संस्थेच्या



अध्यक्षा चंद्रिका चौहान, रोटरी क्लब ऑफ सोलापूरचे अध्यक्ष सुनील माहेश्वरी उपस्थित होते.

३२ सामाजिक संस्था आणि समाजांसाठी चिवडा, लाडू, चकली, गोड शंकरपाळी, शेव, करंजी, अनारसे, खारी शंकरपाळी असे दिवाळी फराळाचे पदार्थ उद्योगवर्धिनी संस्थेतर्फे तयार करण्यात आले आणि केतन वोरा मित्र परिवारातर्फे या फराळाचे वाटप यात्प्रसंगी करण्यात आले.

रेड्डी म्हणाले, मनुष्याला मृत्यूनंतर सोबत काहीच नेता येत नाही आणि जीवन जगण्यासाठी स्वतःला किती लागते ? याचा विचार जर प्रत्येकाने केला तर समाज बदलाची प्रक्रिया वेगाने होईल. आपल्या पूर्वजांनीही हीच शिकवण आपल्याला दिली आहे. वंचितांसाठी काम करणाऱ्या उद्योगवर्धिनी तसेच या सामाजिक संस्थांचे काम पाहून आत्मिक समाधान मिळते, असेही श्री रेड्डी यात्प्रसंगी म्हणाले.

उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान यांनी प्रास्ताविक तर सचिवा मेधा राजोपाध्ये यांनी आभार प्रदर्शन केले. यावेळी विविध सामाजिक संस्थांचे प्रकल्प प्रमुख आणि प्रतिनिधी उपस्थित होते.

या संस्थांना दिला आपुलकीचा फराळ स्व.आधार मतिमंद मुलींची संस्था, प्रार्थना फाउंडेशन, आई संस्था, रॉबिन हूड आर्मी, सोनामाता शाळा, बी. सी. गर्ल्स हॉस्टेल, बी. सी. बॉईज हॉस्टेल, गजानन विद्यालय, प्रेरणा संस्था, आधार संस्था, फोफलिया वृद्धाश्रम, हबीबा संस्था, शांताई वृद्धाश्रम, साकव फाउंडेशन या सोलापूर व धाराशिव जिल्ह्यातील संस्थांना तसेच डोंबारी, मसणजोगी, पारधी, कतारी, मरीआईवाले, बहुरूपी, ओतारी, कैकाडी, लोहार, बंजारा, गोंधळी, रामोशी आदी समाजातील गरजू मुले, ज्येष्ठ नागरिक, निराधार महिला यांच्यासाठी केतन वोरा मित्र परिवारातर्फे फराळ देण्यात आला.


# Classified - छोटी जाहीरात

**यात्रा**

उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर

**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
**९४२२४६०३१९**

**विकणे आहे**

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:**
**9881361260**

**पाहिजेत**

**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे.**
**संपर्क:**
**गणेश स्टील फॅब्रिकेशन**
**९९२२५२५२३७**

**पाहिजेत**

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, मार्केटींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्क: **9591409911 / 9272021110**

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

**-: संपर्क :-**
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

(सरकार मान्य)

**अथर्व पेस्ट कंट्रोल**

An ISO 9001-15
**सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

**बांधकाम**

घर बांधा, सोलापूर महानगर पालिका नियमाप्रमाणे. बांधकाम परवानगी मिळेल. संपर्क:
**चेतन अलकुंटे**
**९५६१४३३३७७**


**लोन**

**संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रकारचे लोन मिळतील**
**संपर्क: 8689934996**

|| श्री अनगरसिद्ध प्रसन्न ||

**R.K कन्स्ट्रक्शन्स्**

इन्फ्रास्ट्रक्चर, इंडस्ट्रीज, अपार्टमेंट यामध्ये सर्व सल्ल्याबाबत तत्पर...



- बांधकाम नकाशा
- इंटेरियर डिझाईन
- 3 D डिझाईन
- कॉन्ट्रॅक्टर वर्क्स
- बांधकाम परवाना
- स्टील डिझाईन
- इस्टिमेट
- साईट सुपरव्हिजन
- ब्लु प्रिंटस्
- लेबर सर्व्हिसेस

संपर्क पत्ता :- इंजि. स्वप्निल पोपट कदम M.E. (Structure) B.E. (Civil)
ऑफिस :- ग्रामीण रुग्णालयासमोर, तहसिल कार्यालयाजवळ, मेनरोड, मोहोळ
Mo. 9552547272, 8788832033 (Email:swapnil9399@gmail.com)

**नका कॅन्सरला आमंत्रण देऊ...**



**दारू... अंमली पदार्थ...**
**गॅरंटेड सुटण्यासाठी...**



व्यसन + टेन्शन + भिती + चिंता + नैराश्य + हस्तकंप + निद्रानाश ..
(महाराष्ट्राचे पसंतदिदा नशामुक्ती सेंटर)
**डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र**
**फोन: 9552619752**
कॉल/व्हॉटस्‌ॲप करा...
दारू... अंमली पदार्थ...
राम राम करा...
501% रिझल्ट


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# कटूसत्य शब्दकोडे क्र. ११२

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | ३ | ■ | ४ | | ■ | ५ | | ६ |
| | ■ | | ■ | ७ | ८ | | ■ | ९ | | ■ | |
| १० | | | ■ | ■ | ११ | | ■ | ■ | १२ | १३ | ■ |
| | ■ | १४ | १५ | ■ | ■ | ■ | १६ | १७ | | | ■ |
| ■ | १८ | ■ | १९ | २० | ■ | २१ | | | ■ | २२ | २३ |
| २४ | | ■ | ■ | २५ | २६ | | | ■ | २७ | ■ | |
| | ■ | २८ | | | | ■ | | ■ | २९ | ३० | |
| ३१ | | | ■ | | ■ | ३२ | | ३३ | | | ■ |
| | ■ | ३४ | ३५ | ■ | ३६ | | ■ | | ■ | ३७ | ३८ |
| | ■ | ३९ | | | | ■ | ■ | | ■ | ४० | |
| ■ | ४१ | ■ | | ■ | | ■ | ४२ | | ■ | ■ | |
| ४३ | | | | | | ■ | | ■ | ४४ | | |

**उभे शब्द :** १) भागाकारच्या विरूध्दार्थी शब्द २) तलाव, पाण्याचा साठा असलेली जंगलातील जागा ३) वाईट, डावा ४) मनातील उत्साह ५) दात घासण्यासाठी वापरतात ती एक प्रख्यात टूथपेस्ट ६) पतीची आई ८) एक श्वसनरोग १३) पाठीचा कणा याच्या साखळीने बनला आहे १५) मोठा तीळ १६) भाजप पक्षाचे नेते व राज्याचे उपमुख्यमंत्र्यांचे आडनाव १७) सल उलट लिहा १८) मुलाची मुलगी २०) फोटो (हिंदीत) २१) पुण्यच्या विरूध्दार्थी शब्द २३) पाणी पिण्याची तीव्र इच्छा २४) महाराष्ट्रातील लेण्यांसाठी प्रसिध्द असलेला जिल्हा २६) फळातील गोड द्रव २७) आईची बहीण २८) एक थोर संत ३०) स्वार्थ, हेतू ३२) मदनाची पत्नी ३३) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक ३५) देवतांनी दिलेला आशीर्वाद ३५) मानहानी करणे ३८) व्यायाम, मेहनत ४१) न बोलण्याचे घेतलेले व्रत ४२) पुरूषांच्या ओठावरील केस

**आडवे शब्द :** १) मराठी वर्षाच्या सुरूवातीचा येणारा सण ४) मराठी वर्षातील सुरूवातीचा महिना ५) हा उगळावा तितका काळाच, अशी एक म्हण आहे ७) सहाय्य ९) सब्र का ** मिठा होता है १०) पाठीवर कठीण आवरण असलेला एक उभयचर जीव ११) कबूल, ** असणे १२) खेळ (इंग्रजीत) १४) पक्का, न बदलाणारा निर्णय या अर्थाने १६) छ. शिवरायांच्या पत्नी सईबाई यांचे माहेर १९) तीन आणि चार मिळून होणारी संख्या २१) हरिणाचे पिल्लू २२) पानाचा विडा याच्यामुळे रंगतो २४) शेतीची नांगर, पाभार ही अवजारे (ग्रामीण भाषेत) २५) जळण २८) सात गुणिले तीन २९) उलटी, ओकारी ३१) गाणे गाणारा ३२) रसाळ, रसयुक्त ३५) होडी, नौका ३५) एक म्हण-** तेथे माती ३७) नशीब (इंग्रजीत) ३९) भीतीने थरथरणे, **** उडणे ४०) एसटीची प्रवासी गाडी ४२) गवंडीकाम वा इतर कामातील कुशल कारागीर ४३) ध्येय साध्य करण्यासाठी या गोष्टी पणाला लावाव्या लागतात-** ** ** ४४) राष्ट्रवादीचे एक नेते-*** पवार

**शब्दकोडे क्र. १११ चे उत्तर**

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | क्ष | य | कु | मा | र | ■ | अ | भि | षे | क | ■ |
| जि | ■ | श | क | ■ | हा | जी | र | ■ | ■ | पि | ळी |
| त | र | ■ | र | पे | ट | ■ | बा | य | ब | ल | ■ |
| प | द | र | ■ | टा | ■ | आ | ज | ■ | ■ | दे | ■ |
| वा | न | वा | ■ | रा | स | ■ | खा | स | ■ | व | य |
| र | ■ | न | थ | ■ | व | त | न | दा | र | ■ | व |
| ■ | सु | गी | ■ | व्हि | ल | न | ■ | शि | का | य | त |
| सा | ग | ■ | ग | ल | त | ■ | पा | व | ■ | ■ | मा |
| ग | र | द | न | ■ | ■ | सा | य | ■ | मं | ग | ळ |
| र | ण | ■ | ■ | स | रा | व | ■ | गो | ड | ■ | ■ |
| ■ | ■ | प | र | त | ■ | का | न | ■ | प | र | वा |
| ■ | स | र | ब | त | ■ | श | र | द | ■ | मा | स |

# विधानसभा २०२४ च्या अनुषंगाने प्रशासनाने केली तयारी - आशीर्वाद






**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समित्यांचे नोडल अधिकारी, जिल्ह्याच्या सर्व 11 विधानसभा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तसेच राजकीय पक्ष व उमेदवाराच्या खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी नियुक्त केलेल्या सर्व अधिकारी कर्मचारी यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत काटेकोरपणे पार पाडावी. निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्येक राजकीय पक्ष व उमेदवाराच्या खर्चाच्या प्रत्येक बाबीवर अत्यंत बारकाईने लक्ष ठेवून तो खर्च संबंधित उमेदवाराच्या खर्च नोंदवहीत नोंदवला गेला पाहिजे याची दक्षता घ्यावी, असे निर्देश निवडणूक खर्च निरीक्षक के. पी. जयकर, मीना तेजराम श्रीमनलाल व बी. ज्योती किरण यांनी दिले.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित जिल्हास्तरीय नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या आढावा बैठकीत सर्व निवडणूक खर्च निरीक्षक मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, पोलीस शहर आयुक्त एम. राजकुमार, पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी, पोलीस शहर उपायुक्त दिपाली काळे, अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर, निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हाधिकारी महसूल अमृत नाटेकर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्यासह सर्व नोडल अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते.

निवडणूक खर्च निरीक्षक जयकर पुढे म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे सर्व नूडल अधिकारी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी यांनी उमेदवाराच्या खर्चाच्या बाबीवर नियंत्रणासाठी सर्व आवश्यक कार्यवाही केलेली आहे. जिल्हास्तरीय खर्च समिती तसेच प्रत्येक विधानसभा मतदारसंघात खर्च समितीची स्थापना झालेली असून त्यांना प्रशिक्षण ही देण्यात आलेले आहे. एस. एस. टी., व्हीएसटी, फ्लाईंग स्कॉड या टीमसह एमसीएमसी समितीची स्थापना झालेली असून या सर्व टीम अत्यंत बारकाईने निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवून तो खर्च उमेदवाराच्या खर्च नोंदवहीत नोंदवला जाईल याची काळजी घेतील. त्याप्रमाणेच जिल्ह्यातील सर्व बँकांनी बँका बरोबरच मोबाईल ॲप्लिकेशन मधील यूपीआय अन्य ऑनलाईन पेमेंट सिस्टीम द्वारा होणाऱ्या प्रत्येक पेमेंटवर, ट्रांजेक्शनवर लक्ष ठेवावे, त्यातील संशयास्पद व्यवहारांची माहिती तात्काळ निवडणूक विभागाला द्यावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

सर्व निवडणूक यंत्रणांनी निवडणूक कालावधीत लहान लहान बाबीवर लक्ष ठेवावे. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्याकडून उमेदवारांना आमिष म्हणून साड्या व अन्य लहान लहान इलेक्ट्रॉनिक वस्तू भेट म्हणून देण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी अशा बाबीवर पोलीस यंत्रणेसह सर्व निवडणूक खर्च पथकांनी काळजीपूर्वक काम करावे. व ही निवडणूक प्रक्रिया अत्यंत शांततापूर्ण वातावरणात होण्यासाठी प्रयत्न करावेत असे आवाहन निवडणूक खर्च निरीक्षक बी. ज्योती किरण यांनी केले.

मागील दोन दिवसापासून सोलापूर शहर उत्तर सोलापूर शहर मध्य सोलापूर शहर दक्षिण व अक्कलकोट या चार विधानसभा मतदारसंघात विविध ठिकाणी भेटी देऊन निवडणूक कामकाजाची माहिती घेतली. तसेच निवडणूक यंत्रणेने केलेल्या तयारीचा आढावा घेतला असून निवडणूक प्रशासनाने तयारी चांगली केली असून सर्व नियुक्त केलेल्या पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांनी दिलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी असे निर्देश निवडणूक खर्च निरीक्षक मीना तेजराम श्रीमनलाल यांनी दिले.

प्रारंभी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 अनुषंगाने जिल्हा निवडणूक प्रशासनाने जिल्ह्यातील अकरा विधानसभा मतदारसंघात जिल्हास्तरीय विविध समित्यांचे नोडल अधिकारी तसेच विधानसभा निहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांनी केलेल्या तयारीची माहिती दिली. तसेच जिल्हा निवडणूक प्रशासन निवडणूक प्रक्रिया यशस्वीपणे राबवण्यासाठी पूर्णपणे सज्ज असून उमेदवाराच्या निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध समित्या तसेच पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे, अशी माहिती देऊन सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना त्यांच्या कामाचे प्रशिक्षणही देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

शहर पोलीस आयुक्त एम राजकुमार व पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी सोलापूर शहर व जिल्ह्याच्या ग्रामीण भागात कायदा व व्यवस्था चोख ठेवण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती दिली. तर जिल्हास्तरीय खर्च समितीच्या नोडल अधिकारी श्रीमती मीनाक्षी वाकडे यांनी खर्चाच्या प्रत्येक बाबीवर जिल्हास्तरीय समिती तसेच विधानसभा निहाय नियुक्त केलेल्या खर्च समितीच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या निर्देशांप्रमाणे प्रशिक्षण देण्यात आल्याचे सांगितले.

यावेळी निवडणूक खर्च निरीक्षक यांनी सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, उत्पादन शुल्क कार्यालय, वस्तू व सेवा कर कार्यालय, आयकर विभाग तसेच जिल्हास्तरीय माध्यम व प्रमाणीकरण समिती व जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक तसेच सर्व बँकर्स यांनी केलेल्या निवडणूक तयारीची माहिती घेऊन त्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या.

### जिल्ह्यात 11 विधानसभा मतदारसंघासाठी तीन निवडणूक खर्च निरीक्षक यांची नियुक्ती

के. पी. जयकर हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. पंढरपूर, माळशिरस व सांगोला या तीन विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त तीन विधानसभा मतदारसंघातील निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर ती तक्रार 99 62 45 25 0 2 या भ्रमणध्वनी क्रमांकावर करावी असे आवाहन त्यांनी केले आहे.

**बी. ज्योती किरण**

ह्या केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. करमाळा, माढा, बार्शी व मोहोळ या चार विधानसभा मतदारसंघासाठी त्या निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खचार्शी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर 94 25 010500 या भ्रमणध्वनी क्रमांकावर करावी असे आवाहन करण्यात येत आहे.

**मीना तेजराम श्रीमनलाल**

हे केंद्रीय राजस्व सेवेतील अधिकारी असून भारत निवडणूक आयोगाने त्यांची नियुक्ती निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून सोलापूर जिल्ह्यात केलेली आहे. सोलापूर शहर उत्तर, सोलापूर शहर मध्य, अक्कलकोट व सोलापूर शहर दक्षिण या चार विधानसभा मतदारसंघासाठी ते निवडणूक खर्च निरीक्षक म्हणून कामकाज पाहणार आहेत. उपरोक्त चार विधानसभा मतदारसंघातील नागरिकांना निवडणूक खर्चाशी संबंधित कोणत्याही प्रकारची तक्रार असेल तर 9115252594 या भ्रमणध्वनी क्रमांकावर करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# पाच वर्षांत आम्ही मतदारसंघात आणला, ही विरोधकांना पोटदुखी - आ. सचिन कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** काँग्रेसचे नेते सांगतात की, आमच्या कार्यकाळात हे केले ते केले. पण त्यांचा कार्यकाळ जेवढा होता. त्या कार्यकाळात जेवढा निधी मिळाला नाही. तेवढा निधी तर केवळ पाच वर्षात आम्ही मतदारसंघात आणला, ही विरोधकांना पोटदुखी आहे, असा घणाघात आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी केला. गुरुवारी विधानसभा निवडणुकीच्या प्रचारासाठी दक्षिण तालुक्यातील दोड्डी, मुळेगाव, मुळेगाव तांडा, बक्षी हिप्परगा, वरळेगाव, वडजी, कासेगाव, गंगेवाडी, उळेवाडी, उळे आदी भागांचा दौरा केला.त्यावेळी ते बोलत होते. आ. कल्याणशेट्टी म्हणाले, उजनीचे पाणी तर आम्हीच आणले आहे. यात दक्षिण सोलापूर तालुक्यातील राहिलेली जी गावे आहेत, त्या गावांनासुध्दा आम्हीच पाणी देणार आहोत. त्यासाठी पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणणे गरजेचे आहे.दक्षिण तालुक्यातील या गावांचे देखील नंदनवन हे महायुती सरकार आल्यावरच होणार आहे. त्यामुळे या भागातून मताधिक्य द्यावे. गेल्या पाच वर्षात मुळेगाव तांडा येथे विकासकामे झाली. काही पूर्ण झाली. काही

मंजूर असून लवकरच सुरू होतील, असेही त्यांनी सांगितले. प्रचारादरम्यान मुळेगाव तांडा व परिसरातील गावातल्या गावकऱ्यांनी आमदार कल्याणशेट्टी यांचे स्वागत केले. या दौऱ्यातील अन्य नेत्यांनी देखील ग्रामस्थांशी संवाद साधत गेल्या पाच वर्षांमध्ये गावासाठी जी विकासकामे झाली, ती पाहता भाजप महायुतीला मतदान करावे, अशी विनंती गावकऱ्यांना केली.यावेळी संदीप राठोड, शंकर राठोड, काशीनाथ पवार, शिवाजी राठोड, रमेश जाधव, अनिल राठोड,नामदेव शिंगाडे, महेश बिराजदार, नेताजी खंडागळे, रवी रोकडे, अनिल बर्वे, महेश पाटील, मारुती शिंगाडे यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ॲड. दिलीप सोपल यांनी बार्शी विधानसभेसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल



**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** महाविकास आघाडीचा घटकपक्ष असलेला उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेकडून माजी मंत्री ॲड.दिलीप सोपल यांनी बार्शी विधानसभेसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. कोणतेही शक्तिप्रदर्शन न करता हा उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आला. बार्शी विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी उध्दव ठाकरे शिवसेनेने जाहीर केलेल्या अधिकृत उमेदवारांच्या पहिल्याच यादीत बार्शीतून ॲड. सोपल यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. यानंतर समर्थक कार्यकत्यांकडून जल्लोष करण्यात आला. गुरुवारी सकाळी अँड. सोपल यांनी निवडणूक निर्णय अधिकारी प्रमोद गायकवाड व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार एफ.आर. शेख यांच्याकडे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी नंदकुमार काशीद, ॲड. विकास जाधव, ॲड. नागेश अक्कलकोटे, हरिभाऊ कोळेकर तसेच शंकर देवकर, नवनाथ चांदणे, बंडू माने आदी उपस्थित होते. मागील २००९ पर्यंत मोठे शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल करण्याची दोन्ही मातब्बरांकडून चढाओढ असायची. नंतरच्या निवडणुकीत मात्र शक्तिप्रदर्शन टाळत मोजक्याच सहकाऱ्यांसह उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले. यंदाच्या निवडणुकीसाठीही गुरुवारी पाच सहा सहकाऱ्यांसह ॲड. सोपल यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. विधानसभा निवडणुकीसाठी २९ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत असणार आहे.

# तालुक्यात देखील परिवर्तनाची सुप्त लाट आली - माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** राज्यात मागील पाच वर्षात झालेल्या गैरकारभाराचा वचपा काढण्यासाठी महाविकास आघाडी सज्ज आहे.यावेळेस राज्यात सुध्दा कोणत्याही परिस्थितीत परिवर्तन होणार असून तालुक्यात देखील परिवर्तनाची सुप्त लाट आली आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांनी केले.गुरुवारी, टीनवाला फंक्शन हॉल येथे आगामी विधानसभा निवडणुकीच्या दृष्टीने महाविकास आघाडीची वूथ नियोजन वैठक पार पडली. यावेळी म्हेत्रे वोलत होते. या वैठकीत पक्षाची आगामी निवडणूक रणनीती आखण्यात आली. याप्रसंगी तालुका काँग्रेस कमिटीच्यावतीने विविध सेलच्या नूतन पदाधिकाऱ्यांच्या निवडी करून त्यांना नियुक्तिपत्र प्रदान करण्यात आले.म्हेत्रे म्हणाले, विद्यमान सरकारचा गैरकारभार तालुक्यातील जनतेपर्यंत पोहोचवून त्यांचे मतपरिवर्तन करून तालुक्यात वदल करण्याचे आव्हान आपल्या सर्वासमोर आहे. २००९ च्या निवडणुकीत आपला पराभव झाला होता. नंतर आपण २०१४ च्या निवडणुकीत परत जिंकलो. त्यामुळे कार्यकर्त्यांनी खचून न जाता नव्या जोमाने कामाला लागून गाव पातळीवरील वूथ यंत्रणा सक्षम करून काँग्रेसचे विचार घरोघरी पोहोचवा, असे आवाहन केले.तालुकाध्यक्ष शंकर म्हेत्रे यांनी अक्कलकोट तालुक्यात गेल्या पाच वर्षात झालेल्या गैरकारभाराचा पाढा वाचला. मल्लिकार्जुन पाटील आणि अश्पाक वळोरगी यांनी राज्यात महाविकास आघाडीची चांगली ताकद निर्माण झाली आहे. सरकार आपलेच येणार आहे. कार्यकर्त्यांनी गाफील राहू नये. एकदिलाने काम करून महाविकास आघाडीला विजयी करावे, असे आवाहन केले.यावेळी रईस टीनवाला, प्रथमेश म्हेत्रे, आनंद वुक्कानुरे, अरुण जाधव, वंदेनवाज कोरवू, वावासाहेव पाटील, सलीम वागवान, राहुल मोरे आदींसह कार्यकर्ते उपस्थित होते.

# तालुकास्तरीय समूहनृत्य स्पर्धेत ' तुपेवस्ती ' प्रथम



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर जिल्हा परिषदेच्या विद्यार्थी व्यक्तिमत्व विकास स्पर्धा २०२४-२५ अंतर्गत तालुकास्तरीय समूह नृत्य स्पर्धा आदर्श केंद्र शाळा महाळूंग ता. माळशिरस येथे संपन्न झाल्या. लहान गटातील या स्पर्धेत जि. प. प्राथ. शाळा तुपे वस्ती, मेडद या शाळेने प्रथम क्रमांक मिळवत जिल्हास्तरावर माळशिरस तालुक्याचे प्रतिनिधित्व करण्याचा मान पटकाविला. इ. १ ली ते ५ वी गटाच्या या समूहनृत्य स्पर्धेत जि. प. प्रा. शाळा तांदुळवाडी आणि जि.प . प्रा. शाळा मुंडफने वस्ती यांनी अनुक्रमे दुसरा व तिसरा क्रमांक मिळविला तर धानोरे आणि पिलीव या शाळांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. पोतराज गीत, आराधी गीत, गोंधळ, शेतकरी गीत, प्रबोधन गीते, लोकगीते असे अतिशय सरस नृत्यप्रकार याप्रसंगी सादर करण्यात आले. तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी प्रदीपकुमार करडे यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा उद्घाटन समारंभ संपन्न झाला. यावेळी केंद्रप्रमुख दिलीप ताटे, प्र. केंद्रप्रमुख दगडू पवार, केंद्रीय मुख्याध्यापक बाळासाहेब साठे, मुख्याध्यापक अशोक पवार, संजीवनी जाधव,नंदेश तिकोटे , बंडू खडतरे, सुभाष मिसाळ आदी शिक्षक उपस्थित होते. स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून अमोल मदाल, शिरीष खोत, बाळासाहेब खंडागळे, अमोल केंगार यांनी काम पाहिले . विजेत्या संघांना श्रीकांत मिसाळ यांचे कडून कै. त्रिंबक नारायण मिसाळ यांचे स्मरणार्थ चषक प्रदान करण्यात आला.स्पर्धेचे सूत्रसंचालन गणपत जाधव आणि प्रमिला गाडे यांनी तर आभार रेखा निर्मळ यांनी मानले.

# पंढरपूर मतदारसंघातून वसंतराव देशमुख यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**महविकास आघाडीकडूनच आपली उमेदवारी असल्याचा दावा**



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख शरद पवार यांच्या आदेशानुसार आपण उमेदवारी अर्ज दाखल केला असून, माझ्या उमेदवारीची शिफारस करणाऱ्या पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील नेतेमंडळींचेही आभार, अशी प्रतिक्रिया वसंतराव देशमुख यांनी उमेदवारी अर्ज भरून झाल्यानंतर दिली. यावेळी त्यांच्या समवेत त्यांचे अनेक सहकारी उपस्थित होते.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघातून महाविकास आघाडीचे, पर्यायाने राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार म्हणून वसंतराव देशमुख यांनी शुक्रवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रथमच यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी, महाविकास आघाडीकडून आपणच उमेदवार असणार याची ग्वाही दिली.

पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेसची उमेदवारी मिळवण्यासाठी मोठी रस्सीखेच चालली होती. मा.आ. प्रशांत परिचारक, अनिल सावंत, भगीरथ भालके, नागेश भोसले आदी मंडळींनी उमेदवारीसाठी आग्रह धरला होता. परंतु अचानक वसंतराव देशमुख यांनी शुक्रवारी शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसकडून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. शरद पवार यांच्या आदेशानुसारच आपण उमेदवारी अर्ज भरला असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत आहे.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील नेत्यांसह विजयसिंह मोहिते-पाटील यांनी वसंतराव देशमुख यांच्या नावाची शिफारस, राष्ट्रवादी प्रमुख शरद पवार यांच्याकडे केली होती. राष्ट्रवादी प्रमुख शरद पवार यांनी आदेश दिल्याप्रमाणे, आपण उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. माझ्या उमेदवारीसाठी झटलेल्या महाविकास आघाडीतील नेतेमंडळींचेही आपण आभारी आहोत, अशी प्रतिक्रिया यावेळी त्यांनी दिली.

पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील सर्व सामान्य नागरिकांकडून देशमुख कुटुंबावर विश्वास दर्शवला आहे. यामुळे यावेळी येथील मतदार आपणास आशीर्वाद देईल, असे विचार यावेळी वसंतराव देशमुख यांनी बोलून दाखवले.

# सोलापूर शहर मध्य मधून सोलापूर विचार मंचच्या डॉ. संदीप आडके यांचा अर्ज दाखल



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** आज सोलापूर शहर मध्य मधून सोलापूर विचार मंचचे डॉ. संदीप शंकरराव आडके यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. यावेळी सोलापूर विचार मंचचे सभासद उपस्थित होते.

सोलापुरातील अनधिकृत चिमणीचा प्रश्न मार्गी लावल्यानंतर सोलापूर होटगी रोड विमानतळ सुरू करण्यामध्ये सोलापूर विचार मंचच्या माध्यमातून डॉ. संदीप आडके यांनी मोठी संघटना उभा करून गेले साडेचार वर्षामध्ये सोलापूरच्या प्रगतीचा मार्ग मोकळा केला आहे. त्यामुळे त्यांना सातत्याने सोलापुरातील सर्व स्तरातील व विशेषतः सुशिक्षित लोकांकडून प्रतिनिधित्व करण्यासाठी सातत्याने मागणी होत होती. आपले अत्यंत व्यस्त वैद्यकीय क्षेत्रातील कामकाज सांभाळत त्यांनी गेले साडेचार वर्ष सोलापूरच्या विमानसेवेचा मार्ग मोकळा करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावलेली आहे. आज सुद्धा सातत्याने सर्व विमान कंपन्यांबरोबर समन्वय राखून येत्या दोन आठवड्यामध्ये सोलापुरातून विमान सेवा सुरू करण्याचे त्यांचे अतोनात प्रयत्न सुरू आहेत.

**सोलापुरातील सर्व मीडिया व नागरिकांना माझे नम्र आवाहन**

सोलापूर शहर मध्य मधून मला निवडून येण्यासाठी आपले मार्गदर्शन व संपूर्ण सहकार्य मिळावे ही विनंती. राजकारण हा माझा व्यवसाय नाही, परंतु केवळ सोलापूरची झालेली दुरावस्था पहावत नसल्यामुळे मला यामध्ये उतरावे लागत आहे.आपण सर्व जण मला सर्वतोपरी सहकार्य कराल व सोलापूरच्या प्रगतीमध्ये हातभार लावाल अशी आशा व्यक्त करतो धन्यवाद.

**- डॉ. संदीप आडके,** अपक्ष उमेदवार, सोलापूर शहर मध्य.

सोलापुरातील अनेक समस्यांमुळे व विमानसेवा नसल्यामुळे गेल्या ४० वर्षामध्ये सोलापूरचे प्रगती खुंटली होती. येथून कोणत्याही स्तरावर उद्योगधंदे वाढीसाठी व सोलापूरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी प्रयत्न झालेले दिसत नाहीत. त्यामुळे सोलापुरातील इतर अनेक ज्वलंत समस्या मार्गी लावण्यासाठी सोलापूरचे सक्षम व अत्यंत सुशिक्षित प्रतिनिधित्व असणे गरजेचे आहे. त्यासाठी डॉ. संदीप आडके यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. गेली ३५ वर्ष गाजत असलेला जुनी मे मील जागेचा घोटाळा डॉ. आडके यांच्या पुढाकाराने सोडवला जात आहे. शहरातील उड्डाणपूल, रेल्वे, परिवहन,स्मार्ट सिटीतील भ्रष्टाचार, महानगरपालिकेतील भ्रष्टाचार, बायोमेडिकल वेस्ट घोटाळा, माळढोक संवर्धन अशा अनेक गोष्टींमध्ये डॉ. संदीप आडके यांनी सोलापूर विकास मंचच्याद्वारे सोलापुरात अत्यंत उत्कृष्ट कामगिरी करून दाखवलेली आहे. त्यामुळे त्यांना सोलापूरच्या प्रगतीसाठी तमाम सोलापूरकर नक्कीच पाठिंबा देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

# महेश कोठे यांना उमेदवारी जाहीर होताच कार्यकत्यांचा जल्लोष



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून विधानसभेसाठी उमेदवारांची पहिली यादी गुरुवारी जाहीर करण्यात आली. यामध्ये सोलापूर शहर उत्तर मतदारसंघातून माजी महापौर महेश कोठे यांना उमेदवारी जाहीर होताच कार्यकत्यांनी फटाके फोडून जल्लोष केला.कोठे यांनी २००९ मध्ये विजयकुमार देशमुख यांच्याशी जोरदार लढत दिली होती. त्या लढतीत कोठे यांचा अवघ्या दहा हजार मतांनी पराभव झाला होता. त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे मनोहर सपाटे यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढविली होती. त्यात त्यांनी १४ हजार मते घेतली होती. मतविभागणी झाल्याने कोठे यांची आमदारकी थोडक्यात हुकली होती. शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदारांविरोधात पक्षातील पदाधिकारी आणि कार्यकत्यांनी उघडपणे बैठक घेऊन टीकास्त्र सोडले होते. या सर्व पार्श्वभूमीवर कोठे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. बोलताना कोठे यावेळी म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी शब्द खरा करून दाखविला, याचा मला अभिमान आहे. पवार यांच्या माध्यमातून शहर उत्तर विधनसभा मतदारसंघातील सर्व समाजासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी आणून विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. गेल्या वीस वर्षांत या मतदारसंघात विकास झाला नाही.मंत्री झाले, पालकमंत्री झाले. मात्र सोलापूरसाठी काय केले, असा प्रश्न विजयकुमार देशमुख यांचे नाव न घेता त्यांनी केला.

# शहर उत्तर साठी उमेदवारांच्या खर्च संबंधी तक्रार निवारण क्रमांक जारी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक 2024 च्या अनुषंगाने, 248 सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघाकरिता निवडणूक खर्च निरीक्षक सोलापूर शहरात दाखल झाले असून नामनिर्देशित उमेदवार यांचे खचार्संबंधी कोणत्याही प्रकारची तक्रार असल्यास 9226864982. या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी 248, सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघ तथा उपजिल्हाधिकारी भुसंपादन क्र. 1, अमोलसिंह भोसले यांनी केले आहे.

मतदारसंघ - 248 सोलापूर शहर उत्तर,

निवडणूक खर्च निरिक्षक - श्री तेजाराम मीना, भ्रमणध्वनी क्रमांक- 9226864982